# ईयू गोपनीयता धोरण

हे गोपनीयता धोरण ("धोरण") युरोपिअन युनियन ("ईयू") आणि युरोपिअन आर्थिक क्षेत्रातील Aviagen समूह ("Aviagen") यांच्या संस्था आणि क्रियाकलापांना लागू होते, आणि Aviagen कश्या प्रकारे तुमची वैयक्तिक माहिती गोळा करून त्यावर प्रक्रिया करते याची माहिती देते. हे धोरण स्वीकारून, आपण या धोरणामध्ये वर्णन केलेल्या आमच्या गोपनीयता कार्यपद्धतींशी सहमती दर्शवता. तुमच्या माहितीवर प्रक्रिया करण्याची जबाबदारी असलेल्या Aviagen ब्रॉयलर पैदासकारांची माहिती aviagen.com/contact-us/ वर उपलब्ध आहे.

**आम्ही नक्की कोणती माहिती कशा प्रकारे गोळा करतो :**

Aviagen त्यांच्या ग्राहकांच्या आणि पुरवठादारांच्या कर्मचारी आणि कंत्राटदारांची, आणि ज्यांच्याशी आम्ही व्यवहार करतो अशा इतर व्यक्ती यांची वैयक्तिक माहिती गोळा करतात. गोळा केलेली माहिती मुख्यत्वे संपर्क तपशील (उदा. नाव, पत्ता, दूरध्वनी आणि ईमेल पत्ता) आणि त्यात आमच्या व्यापारविषयक संबंधाशी निगडित इतरही माहिती असू शकते. आम्ही ही माहिती आमच्या विक्री, मार्केटिंग आणि खरेदी क्रियांमधून Aviagen संकेतस्थळाद्वारे, आणि कार्यक्रमांतून आणि संस्थेला दिलेल्या वैयक्तिक भेटींमधून गोळा करतो.

**आम्ही माहिती कशी वापरतो :**

आम्ही अंतर्गत वित्तीय आणि प्रशासन आणि कायदेशीर अनुपालन यासाठी, वैयक्तिक माहितीवर आपल्या व्यावहारिक संबंधांनुरूप (म्हणजेच विक्री, मार्केटिंग आणि खरेदीसाठी) नेहमीप्रमाणेच प्रक्रिया करतो.

आमच्या उत्पादनांमधील आणि सेवांमधील महत्त्वाचे बदल आपल्याला सांगण्यासाठी, तसेच Aviagen आणि त्यांच्या संलग्न संस्थांच्या सेवा आणि उत्पादने याबद्दल आपल्याला माहिती देण्यासाठी देखील आम्ही आपली संपर्क माहिती वापरतो. जर या कारणासाठी तुमच्याशी संपर्क साधला जावा अशी तुमची इच्छा नसेल, तर कृपया Info@aviagen.com वर ईमेल करा.

या धोरणाच्या अटींना अनुसरून, आम्ही Aviagen संस्थांमध्ये वैयक्तिक माहिती हस्तांतरित करू शकतो. आम्ही वैयक्तिक माहिती विकत नाही.

**"कुकीज":**

Aviagen चे संकेतस्थळ कसे वापरले जाते हे पाहण्यासाठी आणि आमच्या संकेतस्थळामध्ये सुधारणा करण्यासाठी आम्ही कुकीज (तुमच्या वेब ब्राऊजरमध्ये साठवलेल्या छोट्या फाईल्स) वापरतो. त्यांना डिसेबल कसे करायचे यासह, कुकीजबद्दल अधिक माहितीसाठी, कृपया www.cookiecentral.com ला भेट द्या . कुकीज डिसेबल केल्याने आपल्या Aviagen संकेतस्थळाच्या वापरावर फरक पडू शकतो.

**लिंक्स :**

Aviagen संकेतस्थळावर इतर संकेतस्थळांच्या लिंक्स असू शकतात. जेव्हा तुम्ही अशा एखाद्या लिंक वर क्लिक करता, तेव्हा तुम्ही वेगळ्या संकेतस्थळावर प्रवेश करता याची कृपया नोंद घ्या. इतर संकेतस्थळावरील आशयाची जबाबदारी आमची नाही आणि त्या संकेतस्थळांचे गोपनीयता धोरण, जे आमच्यापेक्षा वेगळे असू शकते, ते तुम्ही वाचावेत असे आम्ही तुम्हाला सुचवतो.

**सुरक्षा :**
तुमची वैयक्तिक माहिती (आणि इतर माहिती) अनधिकृतपणे उघड होणे, त्यात बदल होणे किंवा ती नष्ट होणे यापासून वाचवण्यासाठी आम्ही तांत्रिक आणि संघटनात्मक पावले उचलतो. तुमची काही वैयक्तिक माहिती आमच्या अमेरिकेमधील डाटासेंटर मध्ये असलेल्या सुरक्षित सर्व्हर्समध्ये ठेवली जाईल.

**युनायटेड स्टेट्सला हस्तांतरण :**
आम्ही गोळा केलेली वैयक्तिक माहिती Aviagen द्वारे युनायटेड स्टेट्स मधील संगणकांमध्ये साठवली जाऊ शकते आणि त्यावर तिथे प्रक्रिया केली जाऊ शकते, तिथले गोपनीयते बद्दलचे कायदे तुम्ही राहत असलेल्या देशामधील अशा कायद्यांपेक्षा वेगळे असू शकतात. यूएसमध्ये होणारे माहितीचे हस्तांतरण Aviagen संस्थांमधील करारांवर अवलंबून असतील जे युरोपियन कमिशनने मंजूर केलेल्या प्रमाण संविदात्मक अधिनियमांवर आधारित असतील.

**माहितीपर्यंत ऍक्सेस, त्यात बदल आणि माहिती खोडणे :**
तुम्हाला माहिती मिळविण्याचा किंवा त्यात बदल (संपर्क माहितीतील बदलांसकट) करण्याचा अधिकार आहे, त्यात तुमची माहिती दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरित करण्याचाही समावेश आहे. तुम्ही तुमची वैयक्तिक माहिती खोडून टाकण्याची विनंती करू शकता, परंतु तुम्ही यापुढे आमच्यासोबत व्यवसाय करणार नसाल तरी व्यावसायिक आणि कायदेशीर कारणांसाठी आम्हाला तुमची काही वैयक्तिक माहिती अनिश्चित काळासाठी साठवून ठेवावी लागेल. खालीलपैकी कोणत्याही कारणासाठी info@aviagen.com किंवा Aviagen संकेतस्थळावरून कृपया आमच्याशी संपर्क साधा.

**या धोरणातील बदल :**
वेळोवेळी, आमचा व्यवसाय किंवा कायद्यामधील बदल दर्शविण्यासाठी आम्ही या धोरणामध्ये बदल करू शकतो. जर आम्ही धोरणामध्ये काही महत्त्वाचे बदल केले आणि जर आमच्याकडे तुमचा पत्ता आहे, तर आम्ही तुम्हाला सूचित करू.

**तुमचे हक्क आणि संपर्क माहिती :**
जर या धोरणाच्या संदर्भात तुम्हाला काही प्रश्न विचारायचे असतील किंवा तक्रार करायची असेल, तर कृपया आमच्याशी info@aviagen.com वर किंवा Aviagen संकेतस्थळाद्वारे संपर्क साधा. तुमच्या वैयक्तिक माहितीवरील प्रक्रियेबद्दल ईयू कायद्यांतर्गत तुम्हाला तुमच्या देशातील माहिती संरक्षण प्राधिकारींकडे तक्रार करण्याचा अधिकार देखील आहे.

**AVIAGEN NORTH AMERICA** • 920 Explorer Boulevard NW • Huntsville, AL 35806 • USA
*t:* 256.890.3800 • *f:* 256.890.3919 • *w:* www.aviagen.com